त्वरीत पाहिजेत

उपरोक्त विषयानुसार श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथे कोविड -१९ उपाययोजनेअतंर्गत मोठया प्रमाणात PM CARE FUND व CSR च्या माध्यमातून प्राप्त झालेली विविध स्वरुपाची यंत्रसामुग्री तसेच संस्थेमध्ये या पुर्वी उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीच्या आधारे कोविड-१९ रुग्णांना अविरतपणे उपचार प्राप्त होण्यासाठी यासंस्थेतील यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीची कोविड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव असे पर्यंतच्या कालावधीत विशेष देखभाल ठेवणे आवश्यक आहे. तसेच श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ उपलब्ध ज्या यंत्रसामुगीचे देखभाल दुरुस्ती करार करण्यात आलेले नाही अशी यंत्रसामुग्री व उपकरणेसुध्दा कोविड-१९ प्रादुर्भाव कालावधीत पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणे आवश्यक आहे. त्यानुसार श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीच्या देखभाल दुरुस्तीकरीता संस्थास्तरावर एक बायोमेडीकल इंजिनियरची १२० दिवसासाठी खालीलप्रमाणे कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता खालीलप्रमाणे ज़ाहिरात देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | दरमहा एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| १) | इंजिनियर बायोमेडीकल | बायोमेडीकल इंजिनियर या शाखेची मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी | खुला संवर्ग ३८ वर्षापर्यंत मागास संवर्ग ४३ वर्षापर्यंत | रु.२५०००/-(एकत्रित सर्व भत्यासहीत |

(( सर्व साधारण अटी))

१) वरील पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होऊ शकतो. २) वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्य शासनाचा कर्मचारी म्हणता येणार नाही.३) एमएस-सीआयटी परीक्षा पास असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ४) ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत दिनांक व वेळेत प्राप्त होतील त्याच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. ५) सदर पदावर काम करण्याचा अनुभव असल्यास प्राध्यान्य ६) उमेदरावारांना मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. ७) सदर पदावर कंत्राटी स्वरुपात नियुक्त झाल्यास दिवस व रात्रपाळीमध्ये काम करावे लागेल.

(( कर्तव्य व जबाबदाऱ्या))

०१) श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील कोविड १९ उपाययोजनेसाठी PM Care Fund व CSR च्या माध्यमातुन प्राप्त तसेच ज्या यंत्रसामुग्रीचे देखभाल दुरुस्तीचे करार करण्यात आलेले नाहीत अशा यंत्रसमुग्री, उपकरणे इत्यादीबाबींची स्थापना (INSTALL) समायोजन (ADJUST) व त्या अनुषंगाने तांत्रिक सहायक (TECHNICAL SUPORRT) पुरविणे.

०२)सदर उपकरणे यंत्रसामुग्री उदा.व्हेंटिलेटर, लिक्वीड ऑक्सीजन प्लान्ट इत्यादी) अद्ययावत राहण्यासाठी, त्यांची वेळोवेळी देखभाल व आवश्यक ती दुरुस्ती करण्यची जबाबदारी बायोमेडीकल इंजिनियरची राहील.

०३)सदर बायोमेडीकल इंजिनियर या संस्थेतील उक्त उपकरणे व यंत्रसामुग्री इत्यादींचे दररोज परीक्षण करेल व त्यानुसार संस्था प्रमुखास अवगत करेल.

(( विशेष सूचना ))

१) निवड झालेल्या उमेदवारांना तातपुरत्या स्वरुपात १२० दिवसांकरीता कंत्राटी स्वरुपातील नियुक्ती आदेश देण्यात येईल.
२) वरील शैक्षणिक अर्हता व अनुभव प्राप्त (मुळ अनुभव प्रमाणपत्र आवश्यक) करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
३) उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर यंत्रसामुग्रीची देखभाल दुरुस्ती करण्याचा अनुभव आवश्यक राहील.
**४) सदर पद हे शासन पत्रात नमुद केल्याप्रमाणे कोविड १९ या रोगाचा प्रादुर्भाव असेपर्यंत कंत्राटी स्वरुपाचे आहे.**
५) प्रशासकीय किंवा काही कारणास्तव निवड (भरती) प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबवण्याचा अधिकार अधिष्ठाता, श्री:वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ यांना आहे.
६) निवड झालेले उमेदवार निव्वळ तातपुरत्या कंत्राटी (करार ) स्वरुपातील असल्याने ते कधीही व केव्हाही कमी करण्यात येतील. त्यावर त्यांना कोणताही कायम स्वरुपाचा हक्क सांगता येणार नाही.
७) सदरील पदावर कंत्राटी स्वरुपात कार्यरत उमेदवारास भविष्यात सदरील जागेवर कायमस्वरुपी नेमणूकीचा कोणताही हक्क राहणार नाही असे उमेदवारास लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर करावे लागेल.
८) नियुक्ती झाल्यानंतर सेवा सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी कोणत्याही सबबीशिवाय कोणत्याही उमेदवाराची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राखुन ठेवले आहेत.

९) सदर पदाकरीता वेतन एकत्रित स्वरुपातील आहे (कंत्राटी वेतन).

१०) अर्जासोबत पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रे (प्रत्येक वर्षाची गुणपत्रिका, पासिंग सर्टीफिकेट, डीग्री (अत्यावश्यक), इंटर्नशिप कम्प्लीशन सर्टीफिकेट (असल्यास) वर्ग १० चे प्रमाणपत्र बारावीचे प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र व पासपोर्ट साईज फोटो व ओळखपत्र (टिसी/आधार कार्ड/पॅन कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट पैकी कोणतेही दोन) जोडाव्यात. (उपरोक्त सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जा सोबत जोडणे आवश्यक राहील)

११) विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी या संस्थेच्या संकेतस्थळावर व संस्थेच्या नोटीस बोर्ड वर दिनांक ६/०४/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल व पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरीता सर्व मुळ प्रमाणपत्रांसह दिनांक ०९/०४/२०२१ रोजी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.तसेच मुलाखतीकरीता अनुपस्थित असणाऱ्या उमेदवारांच्या अर्जावर विचार करण्यात येणार नाही

१२) मुलाखतीच्या वेळेस सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक राहील व मुळ कागदपत्रे सादर न करण्याऱ्या उमेदवाराचा अर्ज अग्राह्य ठरविण्यात येईल.

१३) अर्ज सादर करावयाचा पत्ता -स्व-हस्ते अधिष्ठाता कार्यालय, श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील आवक - जावक विभाग (कार्यालयीन वेळेत)

१४) अर्ज कार्यालयात सादर करतेवेळी रु.५००/- ची शासन खाती जमा केल्याबाबतची पावती रोखा विभाग, रुग्णालय यांचे कडे भरणा करुन अर्जा सोबत पावती सादर करण्यात यावी. चलनाशिवाय अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

१५) मुलाखतीचे ठिकाण: महाविद्यालय परीषद हॉल, श्री.व.ना. शा. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ

१६) अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक ०३/०४/२०२१

१७) मुलाखतीचा दिनांक ०९/०४/२०२१ (वार: शुक्रवार)

वेळ : दुपारी 12.30 (वाजता)

अधिष्ठाता,
श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
यवतमाळ

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथे इंजिनियर बायोमेडीकल पद

भरण्याकरीता

<u>अर्जाचा नमुना</u>

प्रति,
मा.अधिष्ठाता,
श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय,
यवतमाळ.

विषयः- इंजिनियर बायोमेडीकल <u>या पदाकरिता अर्ज...</u>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे नाव | | | |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता | | | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक/संपर्क क्रमांक | | | |
| ४ | जात व प्रवर्गः | लिंगः- | विवाहीतः- | अविवाहीतः- |
| ५ | जन्मतारीख - | | | |

<u>शैक्षणिक अर्हताः</u>

| अ. क्र. | पदाचे नाव | MSCIT | बोर्डाचे/ विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | विषय | टक्केवारी व गुण (पदवी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | इंजिनियर बायोमेडीकल | | | | | |

अनुभवः

| अ.क्र. | पदाचे नाव | शासकीय / खासगी संस्था | संस्थेचे नाव | अनुभव कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे: १)............२)............३)............५)............६)..............

मला पूर्णपणे जाणीव आहे की, कंत्राटी पध्दतीने इंजिनियर बायोमेडीकल पदाकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद योजनेच्या व्याप्ती प्रमाणे कमी /अधिक करण्यात येतील. ही नियुक्ती **कोविड १९ या रोगाचा प्रादुर्भाव असेपर्यंत** ही नियुक्ती पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल.

प्रमाणीत करण्यात येते की, या अर्जामध्ये सादर केलेली माहिती खरी असून ती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास मला सेवेस अपात्र समजून होणाऱ्या कारवाईस पात्र राहील.

स्थळः-
दिनांकः-

उमेदवाराची स्वाक्षरी

(उमेदवाराचे पूर्ण नाव..................)